# १३ मेट्रो स्थानकांचे खोदकाम पूर्ण

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

- कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो मार्ग ३
- उर्वरित १३ स्थानकांचे खोदकाम मेपर्यंत

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३ प्रकल्पाने मंगळवारी आणखी एक महत्त्वाचा टप्पा पूर्ण केला. मेट्रोच्या २६ स्थानकांपैकी १३ स्थानकांचे खोदकाम पूर्ण झाले आहे. उर्वरित १३ स्थानकांचे खोदकाम मे महिन्यापर्यंत पूर्ण होणार आहे.

खोदकाम पूर्ण झालेल्या स्थानकांमध्ये कफ परेड, विधान भवन, चर्चगेट, हुतात्मा चौक, सीएसएमटी, सायन्स म्युझियम, सिद्धिविनायक, एमआयडीसी, मरोळ नाका, सहार रोड, आंतरदेशीय व आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि सीप्झ या स्थानकांचा समावेश आहे. 'सध्या सुरू असलेल्या स्थानकांच्या कामाला आणखी गती देण्यात येईल. उर्वरित स्थानकांचे खोदकामही युद्धपातळीवर सुरू असून, येत्या ३-४ महिन्यांत ते पूर्ण होईल. एकंदरीत ८७ टक्के खोदकाम पूर्ण झाले आहे', अशी माहिती संचालक (प्रकल्प) एस. के. गुप्ता यांनी दिली.

मेट्रो मार्गांच्या बोगद्याची कामे तर ७० टक्क्यांपेक्षा जास्त प्रमाणात पूर्ण झाली आहेत. एकूण ५५ किमी लांबीच्या बोगद्यांपैकी ३८ किमीपेक्षा जास्त बोगद्यांची कामे झाली असून, २३ बोगदे पूर्ण झाले आहेत. त्यासाठी जवळपास १६ हजार कर्मचारी कार्यरत आहेत.

## उर्वरित स्थानकांचे खोदकाम असे...

- काळबादेवी स्थानक : २६ टक्के
- गिरगाव : १४ टक्के
- ग्रँट रोड : ५६ टक्के
- मुंबई सेंट्रल : ७३ टक्के
- महालक्ष्मी : ७५ टक्के
- आचार्य अत्रे चौक : ३९ टक्के
- वरळी : ८२ टक्के
- दादर : ८८ टक्के
- शितला देवी : ७१ टक्के
- धारावी : ८१ टक्के
- बीकेसी : ८३ टक्के
- विद्यानगरी : ८७ टक्के
- सांताक्रूझ : ९३ टक्के